पुण्य नगरी

# कवितेच्या माध्यमातून वैविध्यपूर्ण जीवन अनुभवांचे सादरीकरण



**परभणी / प्रतिनिधी**

मानवी जीवनातील नाते संबंधांवर भाष्य करणाऱ्या कथा आणि रंगतदार कवितांच्या माध्यमातून येथे साहित्य मंच हा कार्यक्रम पार पडला. कथा व कविता वाचनांच्या माध्यमातून लेखक, कवींनी आपले वैविध्यपूर्ण जीवन अनुभव यावेळी विशद केले. साहित्य अकादमी व श्री.शिवाजी महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम घेण्यात आला.

येथील श्री. शिवाजी महाविद्यालयाच्या सभागृहात पार पडलेल्या या कार्यक्रमात बा. बा. कोटंबे, मिलिंद जाधव यांनी कथा वाचन केले तर मोहन कुलकर्णी, केशव खटींग, संतोष नारायणकर यांनी कविता वाचन केले. या कार्यक्रमाला प्राचार्य डॉ. बी. यू. जाधव, डॉ. आसाराम लोमटे यांची उपस्थिती होती. लोमटे यांनी प्रास्ताविकात साहित्य मंच या उपक्रमामागील हेतू विशद केला. प्रारंभी कोटंबे यांनी पडझड या कथेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील कुटुंब व्यवस्थेतील पेच सांगितला. बदलत्या काळाचा परिणाम कुटुंबातल्या नात्यावर कसा होतो हे या कथेतून त्यांनी सांगितले तर मिलींद जाधव यांनी खुलासा या कथेतून एका मध्यमवर्गीय कुटुंबातल्या नाट्यावर प्रकाश टाकला. या दोन्ही कथांना उपस्थितांनी दाद दिली.

मोहन कुलकर्णी, कवी केशव खटींग यांनी कविता सादर केल्या. कवी संतोष नारायणकर यांनी सादर केलेल्या कवितांनाही दाद मिळाली. अध्यक्षीय समारोप प्राचार्य बी.यू.जाधव यांनी केले. कार्यक्रमाला ज्येष्ठ कवी केशव बा.वसेकर, रेणू पाचपोर, सरोज देशपांडे, तुकाराम खिल्लारे, राजेंद्र गहाळ, प्रा. भगवान काळे, गंगाधर गायकवाड, माणिक पुरी, प्रा.जयंत बोबडे, प्रा.सखाराम कदम, सुरेश हिवाळे, शरद ठाकर, बालासाहेब जाधव, दत्ता चव्हाण, त्र्यंबक वडसकर, प्रा. प्रवीण पुरी, प्रा.मयुरी शिंदे, प्रा. सारिका पासंगे, प्रा.स्वाती देशमुख, मारोती डोईफोडे, माणिक रासवे, सुरेश पेदापल्ली आदी उपस्थित होते.प्रा. बडुरे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. प्रल्हाद भोपे यांनी आभार मानले.

Parbhani Edition
Mar 18, 2025 Page No. 04
Powered by: erelego.com